**प्रेस नोट** ला.प्र.वि., जळगांव.

दि. ०९/०५/२०२६

**सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव येथील योगेश अभिमन्यु अहिरे, वय ४४ वर्ष, पद-शाखा अभियंता, वर्ग-२ यांच्याविरुध्द यशस्वी सापळा कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | जळगांव |
| **फिर्यादी** | श्रीमती रेश्मा अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नंदुरबार, कॅम्प जळगांव. |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | जिल्हापेठ पोलीस स्टेशन, जि.जळगाव गु.र.नं. /२०२६. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे. |
| **लाचेची मागणी रक्कम** | प्रथम १८,००,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती १५,००,०००/- रु. मागणी केली,त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन ५,००,०००/-रु लागलीच व उर्वरीत १०,००,०००/- रु. बील मंजुर केल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले. |
| **स्विकारलेली रक्कम** | **५,००,०००/- रु.** |
| **थोडक्यात हकिगत** | यातील तक्रारदार हे सब कॉन्ट्रक्टर असुन त्यांना जळगांव शहरात वार्ड क्र. १४ विनोबानगर येथील सिमेंट कॉन्क्रीट रोडचे ८०,३९,७४२/- रुपयाचे काम सन २०२४ मध्ये मंजुर झाले होते. सन २०२५ मध्ये सदरचे काम मुदतीत पुर्ण केल्यानंतर निधी उपलब्ध नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांचेकडुन नमुद कामाचे एकुण ८०,३९,७४२/- रु. या रक्कमेपैकी तक्रारदार यांना अंदाजे ५८ लाख रुपये बिल मंजुर झाले होते. त्यापैकी तक्रारदार यांना अंदाजे ४२ लाख रुपये माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये प्राप्त झाले होते. तक्रारदार यांचे वर नमुद कामाचे उर्वरीत ३८,४९,७४२/- रु. असे एकुण बिल अद्याप पावेतो अप्राप्त होते. त्यामुळे तक्रारदार सदर बिलाबाबत विचारपुस करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव येथील श्री. योगेश अभिमन्यु अहिरे, शाखा अभियंता, वर्ग-२ यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे यापुर्वी अदा केलेल्या बिलाचे काम करुन दिल्याचे मोबदल्यात व उर्वरीत बिल मंजुर करुन देण्यासाठी १८,००,०००/- रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी दि.०५.०५.२०२६ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०५.०५.२०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव येथे सदर तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता लोकसेवक श्री. योगेश अभिमन्यु अहिरे, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांनी तक्रारदार यांच्याकडे यापुर्वी अदा केलेल्या बिलाचे काम करुन दिल्याचे मोबदल्यात व उर्वरीत बिल मंजुर करुन देण्यासाठी **प्रथम १८,००,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती १५,००,०००/- रु. (त्यात ७,५०,०००/-रु स्वत:साठी व उर्वरित ७,५०,०००/- रु. त्याचे वरीष्ठ अधिकारी यांच्यासाठी) मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन ५,००,०००/- रु लागलीच व उर्वरीत १०,००,०००/-रु** काम झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>दि. ०९.०५.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान नमुद लोकसेवक श्री. योगेश अभिमन्यु अहिरे, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांनी तक्रारदार यांच्याकडुन वरप्रमाणे मागणी केलेली ५,००,०००/- रु. पंचासमक्ष तक्रारदार यांना लोकसेवक योगेश अहिरे यांनी त्यांच्याकडील निळया रंगाची बलेनो कार क्र. एम.एच.१९, सी.व्ही.२६१९ यामधील समोरील सिटखाली ठेवण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारली असता त्यांना ला.प्र.वि., जळगाव विभागाने रंगेहाथ पकडले |

| | |
|---|---|
| | आहे तसेच त्यांचे वर नमुद लाचमागणी व्यतिरिक्त एकुण बीलाचे ६ टक्के प्रमाणे रक्कम नगरसेविकाचे मुलास देण्यास तक्रारदार यांना पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान सांगुन लाच मागणीस प्रोत्साहन दिले, म्हणुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. |
| **सापळा कारवाई** | **पर्यवेक्षण अधिकारी** - श्री. योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव.<br>**सापळा अधिकारी** - श्रीमती रेश्मा अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नंदुरबार, कॅम्प जळगांव.<br>**सापळा पथक** - श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगांव,<br>श्रेणी पोउनि/सुरेश पाटील, मपोहेकॉ/संगीता पवार, पोहेकॉ/बाळु मराठे,<br>पोकॉ/प्रदिप पोळ, पोकॉ/भुषण पाटील, सर्व नेमणुक - ला.प्र.वि. जळगांव.<br>**तपासी अधिकारी** - श्री. योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि., जळगांव. |
| **मार्गदर्शन** | **१) मा. श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा. श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव येथे सपंर्क करावा.**

| | | |
|---|---|---|
| **संपर्क पत्ता** | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव. |
| **संकेतस्थळ** | :- | acbmaharastra.gov.in |
| **ई-मेल/ऑनलाईन तक्रार** | :- | spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com |
| **टोल फ्रि क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२५७-२२३५४७७ |
| **व्हॉट्सअप मोबाईल क्रमांक** | :- | ७५८८६६१०६४. |